दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १८६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.६ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com




# शांत आहोत तर शांत राहू द्या ; पिसाळायला लावू नका

## उद्धव ठाकरेंची एकनाथ शिंदेंना 'वॉर्निंग'



**दै.रायगड नगरी । मुंबई**

**गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेनेच्या शिवतीर्थावरील भाषणात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय बोलणार याची चर्चा सुरू होती. आज दादरच्या शिवाजी पार्कवर असलेल्या दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे यांची तोफ धडाडली. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या राज्य सरकारने शिवसैनिकांना त्रास देऊ नये. जोपर्यंत शिवसैनिक शांत आहेत तोपर्यंत राहू द्या, पिसाळायला लावू नका, असा सज्जड दम उद्धव ठाकरेंनी शिंदे गट आणि भाजपाला दिला.**

शिवसेना ही एकट्या दुकट्याची नाही. जोपर्यंत तुम्ही माझ्यासोबत आ–हात, तोपर्यंत मी पक्षप्रमुख आहे. एक जरी निष्ठावंत शिवसैनिक उठून बोलेन गेट आउट...मी असाच पायऱ्या उतरून घरी निघून जाईन, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. तसेच हॉस्पिटमध्ये असताना ज्यांच्यावर जबाबदारी दिली ते कटाप्पा कट करत होते. हा पुन्हा उभा राहूच कसा शकणार नाही. पण त्यांना कल्पना नाही, हा उद्धव ठाकरे नाही, उद्धव बाळासाहेब ठाकरे आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

तसेच या सरकारला १०० दिवस पुर्ण होतंय. मात्र त्यातले ९० दिवस दिल्लीला गेले, असा टोला उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना लगावला. हिंदुत्वावर बोलताना माझं स्पष्ट मत आहे. काय हिंदुत्व?, सगळे काही तथाकथित हिंदुत्ववादी आहेत, त्यांनी एक मंचावर या. त्यांनी त्यांचं हिंदुत्व काय आहे सांगावं आणि मी माझं हिंदुत्व काय आहे सांगतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले. माझ्या मनात एकदा विचार आला होता की, या सभेला येण्याऐवजी तिकडे जाऊन नवीन हिंदुत्वाचे विचार ऐकून यायचे, असा मिश्किल टोलाही देखील उद्धव ठाकरेंनी लगावला.

अमित शाह हे देशाचे गृहमंत्री आहेत की घरगुती मंत्री आहेत का हेच कळत नाही. या राज्यात जा, त्या राज्यात जा, काड्या घाला आणि सरकारं पाडा, असे उद्योग अमित शाह यांच्याकडून सुरु असतात, अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. अमित शाह हे मुंबईत येऊन म्हणतात की, शिवसेनेला जमीन दाखवा. तुम्ही शिवसेनेला जरुर जमीन दाखवा, ही जमीन आमचीच आहे, पण अमित शाह यांनी आम्हाला पाकव्याप्त काश्मीरची जमीन जिंकून दाखवावी, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी अमित शाहांना दिले. ते बुधवारी दसरा मेळाव्यात बोलत होते.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पूर्वीच्या काळी नरेंद्र मोदी, 'पाकिस्तान को उसी की भाषा मे उत्तर देना चाहिए', असे बोलायचे.

### अमित शाहांचा दावा ठाकरेंनी पुन्हा फेटाळला

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी भाजपचा दावा पुन्हा एकदा फेटाळून ला–वला. मी शिवरायांच्या साक्षीने आणि माझ्या आईवडिलांची शपथ घेऊन सांगतो की, अमित शाह यांच्यासोबतच्या भेटीत शिवसेना आणि भाजपमध्ये मुख्यमंत्रीपद अडीच–अडीच वर्षे वाटून घेण्याचे ठरले होते. मात्र, त्यानंतर अमित शाह म्हणाले की, शिवसेनेला मुख्यमंत्रीपद देणे शक्य नाही. मग आत्ता केलंत ते तेव्हाच का केलं नाहीत? पण तुम्हाला शिवसेना संपवायची होती, असे टीकास्त्र उद्धव ठाकरे यांनी सोडले.

### गद्दारीचा शिक्का आयुष्यभर पुसला जाणार नाही : उद्धव ठाकरे

शिवसेनेतील फुटीनंतर होत असलेल्या पहिल्याच दसरा मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्यासोबत बंडखोरी केलेल्या आमदार आणि खासदारांवर घणाघाती टीका केली. शिवसेनेतून काही लोकांनी गद्दारी केली, होय गद्दारच म्हणणार. कारण आता त्यांच्या बुडाखाली जरी मंत्रिपदाच्या खुर्च्या चिकटल्या असतील तर त्या एक दिवस निघून जातील. मात्र कपाळावरचा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही, असा हल्लाबोलही उद्धव ठाकरे यांनी केला.

मग चीनचे सैन्य भारतीय हद्दीत घुसखोरी करते तेव्हा तुमची ही भाषा कुठे जाते. तिकडे शेपट्या घालायच्या आणि इकडे पंजे काढायचे. आता तुम्ही गद्दारांच्या पालख्यांमध्ये बसून कशाला नाचताय? तुम्ही पाकव्याप्त काश्मीर भारता आणा आम्हीच तुम्ही तुम्हाला पूर्वीप्रमाणे डोक्यावर घेऊन नाचू, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही भाजपची साथ सोडली म्हणजे आम्ही हिंदुत्व सोडलं नाही. तुम्ही हिंदुत्व हिंदुत्व करत गायीवर बोलता, महागाईवर बोला ना. महागाईच्या वेदना तुम्हाला जाणवू नयेत, म्हणून हिंदुत्वाचा डोस द्यायचा. तुम्ही महागाईवर बोललात, तर जय श्रीराम म्हणतील. ह्रदयात राम आणि हाताला काम पाहिजे. पण हे महागाईवर बोलत नाहीत, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजप नेत्यांवर निशाणा साधला.

याचबरोबर, कुणाच्यातरी थडग्यावर जाऊन बोलायचं की हे थडगं बघा कसं सजवलं. पाकिस्तानात जाऊन जिनांच्या थडग्यावर डोकं टेकवणारी तुमची औलाद, तुमच्याकडून आम्ही हिंदुत्व शिकायचं? नवाज शरीफांच्या वाढदिवसाला न बोलवता जाऊन केक खाणारा तुमचा नेता आणि तुम्ही आम्हाला हिंदुत्व शिकवणार? काश्मीरमध्ये सत्तेच्या लोभापायी दहशतवाद्यांशी संबंध असलेल्या मुफ्तीच्या पक्षाशी तुम्ही साटंलोटं करता आणि आम्हाला हिंदुत्व शिकवता?, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

**कायद्याच्या चौकटीत राहून बोला. नाहीतर कायदा आपलं काम करेल. देवेंद्रजी तुम्ही गृहमंत्री आहात. कायदा तुम्हालाच कळतो असे नाही, आम्हाला सगळ्यांना कायदा कळतो. कायदा पाळायचा असेल तर तो सगळ्यांनी पाळायला पाहिजे. आम्ही कायदा पाळायचा आणि तुम्ही ही डुकरं पाळायची, हे चालणार नाही.**

**पाकिस्तानमधील माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या वाढदिवसाला न बोलवता जाऊन केक खाणारा तुमचा नेता आणि तुम्ही आम्हाला हिंदुत्व शिकवणार? अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजप नेत्यांवर निशाणा साधला.**

# बापाचे विचार विकले, मग तुम्हाला बाप विकणारी टोळी म्हणायचं का? : एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**बाप चोरला बाप चोरला असं तुम्ही वारंवार म्हणता पण त्यांच्या विचारांना तिलांजली देऊन तुम्ही बापालाच विकण्याचा विचार केलात. मग आम्ही तुम्हाला बाप विकणारी टोळी म्हणायचं का? असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. ते मुंबईत बीकेसी येथील एमएमआरडीए मैदानात आयोजित दसरा मेळाव्यात बोलत होते. एकनाथ शिंदे यांनी यावेळी भाषणाला सुरुवात करण्याआधी उपस्थित जनसमुदायासमोर नतमस्तक होऊन खरी शिवसेना कुठं आहे हे आज सिद्ध झालं असं म्हटलं.**

### खरी गद्दारी २०१९ साली झाली

आम्हाला सारखं गद्दार गद्दार म्हटलं जातं. पण आज मी सांगतो आम्ही गद्दारी नव्हे, हा गदर आहे. गदर म्हणजे उठाव आणि क्रांती. शिवसेनेचं पानिपत होईपर्यंत तुम्ही शांत बसला होता. अडीच वर्ष आम्हाला ही गोष्ट कळली नाही का असं तुम्ही बोलता. पण हे आज जे सगळे आमदार इथं मंचावर आहेत तेच माझ्याजवळ अडीच वर्ष वारंवार आपल्या भावना बोलन दाखवत होते. पण बाळासाहेबांच्या प्रेमापोटी आम्ही सहन करत होतो. आम्ही गद्दारी केली नाही. खरी गद्दारी तर २०१९ साली झाली. तुम्ही जनतेच्या मताचा अपमान केलात. जनतेला युतीला कौल देऊनही तुम्ही नकोशी आघाडी केली. मग तेव्हा तुम्ही जनतेशी गद्दारी केली नाही का?, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

**काँग्रेसवाल्यांनी पंतप्रधान मोदींची खिल्ली उडवली, त्या पक्षाची आज अवस्था वाईट आहे. त्यांच्याकडे पक्ष आहे पण अध्यक्ष नाही, आणि इथे अध्यक्ष आहे पण पक्ष नाही, अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी आपल्या दसरा मेळाव्याच्या भाषणात उद्धव ठाकरेंसह काँग्रेसची खिल्ली उडवली. सत्तेच्या हव्यासापोटी बाळासाहेबांच्या विचारांना उद्धव ठाकरेंनी मूठमाती दिली. मी आज सांगतो. शिवसेना उद्धव ठाकरेंची नाही. शिवसेना एकनाथ शिंदेंची देखील नाही. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरेंचीच आहे आणि वारसा विचारांचा असतो. सत्तेपेक्षा सत्य आणि सत्व महत्वाचं. बाळासाहेबांचे वारसदार हे विचारांचे वारसदार. वारसा विचारांचा असतो तो जपायचा असतो.**



आम्हाला शिवतीर्थवर परवानगी मिळाली नाही तरी आजच्या गर्दीनं खरी शिवसेना कुठं आहे सिद्ध झालं आहे. या विराट सभेला उपस्थित राहणाऱ्या जनतेसमोर मी नतमस्तक मी झालो. कारण आज राज्याच्या कानाकोपऱ्यातून तुम्ही आला आहात. काल रात्रीपासूनच तुम्ही इथं आलात. कारण बाळासाहेबांचे विचार आपण पुढे घेऊन जात आहोत. सत्तेच्या हव्यासापोटी बाळासाहेबांच्या विचारांना उद्धव ठाकरेंनी मूठमाती दिली. मी आज सांगतो. शिवसेना उद्धव ठाकरेंची नाही. शिवसेना एकनाथ शिंदेंची देखील नाही. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरेंचीच आहे आणि वारसा विचारांचा असतो. सत्तेपेक्षा सत्य आणि सत्व महत्वाचं. बाळासाहेबांचे वारसदार हे विचारांचे वारसदार. वारसा विचारांचा असतो तो जपायचा असतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

मला मरणाची भीती नाही. मी काम करणारा कार्यकर्ता आहे. तुमच्या नावापुढे मुख्यमंत्रीपद लागलं यातच तुमची खुशी होती. पण शिवसेनेचा झेंडा आणि राष्ट्रवादीचा अजेंडा हे तुम्हाला दिसलं नाही. अडीच वर्षात तुम्ही मंत्रालयात केवळ अडीच वेळा आलात. कोरोना काळात तुम्ही सगळं बंद केलं. पण तुमची दुकानं मात्र चालू होती. आता कोणती दुकानं चालू होती ते मला बोलायला लावू नका. कारण माझ्यापेक्षा जास्त इतर कुणाला माहित असणार? पाकिस्तान झिंदाबाद बोलणाऱ्यांबाबत तुम्ही कोणतीही भूमिका घेतली नाही? यामागचं कारण काय?, असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. सरकारचे प्रमुख तुम्ही होता पण, राष्ट्रवादीच्या पडलेल्या नेत्यांना निधी मिळत होता, ताकत मिळत होती.

आम्हाला १०–२० कोटी आणि त्यांना शंभर–दोनशे कोटी निधी मिळायचा. हा अन्याय आम्ही अडीच वर्षे सहन केला. त्यानंतरच ही भूमिका घेतली. आणि म्हणूनच ५० आमदार आणि १८ खासदारांनी, देशातील १४ राज्य प्रमुखांनी, शेकडो पदाधिकारी, हजारो समर्थकांनी मला का पाठिंबा दिला. यांनी आम्हाला का पाठिंबा दिला, याचा तुम्ही विचार केला का? आम्हाला गद्दार बोलण्यापेक्षा याचे आत्मपरीक्ष करा.

# संक्षिप्त...

## सर्पदंश झालेल्या तरुणाला दिले जयवंत ठाकूर सर्पमित्रांनी जीवदान

**दै.रायगड नगरी । उरण**

पुनाडे आदिवासी वाडीवरील सुरेश अंबाजी कातकरी (वय २२ वर्षे) या तरुणांला रात्री १-०४ च्या सुमारास सर्पदंश झाल्याची घटना मंगळवारी (दि ४) घडली.चिरनेर गावातील सर्पमित्र जयवंत ठाकूर यांना सदर घटनेची माहिती मिळताच त्यांनी प्रसंग सावध पणाने सुरेश कातकरी या तरुणाला तातडीने नवीमुंबई येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करुन घेतले. डॉक्टरांच्या पथकाने शर्थीचे प्रयत्न करुन आदिवासी तरुणांचे प्राण वाचले आहे.

उरण तालुक्यातील फ्रेंड्स ऑफ नेचर ( फॉन ) या संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी माहिती देताना सांगितले की उरण तालुक्यातील अतिदुर्गम भागातील पुनाडे आदिवासी वाडीवरील सुरेश अंबाजी कातकरी या २२ वर्षाच्या तरुणाला मंगळवार दि४ रोजी रात्री १-०४ च्यासुमारास सर्पदंश झाल्याचे आदिवासी बांधवांकडून सांगण्यात आले.सदर घटनेची माहिती सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी आपले सहकारी सर्पमित्र गोरख यास देऊन तातडीने सर्पदंश झालेल्या तरुणाला प्राथमिक उपचार म्हणून कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णालयात नेण्यात आले.परंतु रुग्णालयातील डॉक्टर हे निद्रिस्त अवस्थेत असल्याचे व रुग्णवाहिकेवर चालक नसल्याचे भयानक चित्र पहावयास मिळताच, सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी प्रसंग सावध पणाने खाजगी गाडीतून नवीमुंबई रुग्णालयात जाण्याचा निर्णय घेतला.

एकंदरीत सुरेश कातकरी या तरुणाला नाग सापा पेक्षा १० पट विष जहाल असलेला मण्यार जातीचा साप चावल्याचे समजताच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी नवीमुंबई येथील रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधून सर्पदंश झालेल्या तरुणाला उपचारासाठी घेऊन येतो असे सांगितले, परंतु वेळ होत असल्याने सुरेश कातकरी यांच्या अंगात जहाल विष पसरण्यास सुरुवात झाल्याने त्यांनी नवीमुंबई येथील रुग्णालयाच्या आवारात रक्ताची उलटी केली. रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णांवर उपचारासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

सकाळी ठिक ६ वाजता सुरेश कातकरी हा तरुण सुरक्षित असल्याचे डॉक्टरांनी सर्पमित्र जयवंत ठाकूर यांना सांगितले.जयवंत ठाकूर यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. आणि डॉक्टरांच्या सहकार्याने आदिवासी तरुणांचे प्राण वाचले आहे.

एकंदरीत फ्रेंड्स ऑफ नेचर ( फॉन) च्या सर्पमित्रांनी नवीमुंबई रुग्णालयातील डॉक्टरांच्या सहकार्याने सुरेश कातकरी या तरुणा प्रमाणे ४० सर्पदंश झालेल्या नागरिकांना जीवनदान दिले असल्याचा समाधान शेवटी सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी व्यक्त केला.ततपुर्वी सुरेश कातकरी या तरुणाचे प्राण तर वाचविले पण सुरेश यांच्या पुढील उपचारासाठी थोडी मदतीचा ही हात ही पुढे केला आहे असे सुरेश चे वडील अंबाजी कातकरी यांनी सांगितले.

# श्री धावीर महाराज पालखी सोहळा ; प्रत्येक रोहावासीयांचा आपला उत्सव!





आश्विन महिना आला की सगळीकडे कसं आल्हाददायक वाटू लागतं. आदिमाया, आदिशक्ती म्हणजे नारीशक्तीचे पूजन. तेज, स्फूर्ती व नवरंगांची उधळण. नवरात्रीची सांगता होते दसरा या सणाने. सगळीकडे मंगलमय वातावरण असतांना रोहावासियांना वेध लागतात ते ग्रामदेवता धावीर महाराजांच्या पालखीउत्सवाचे! दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी होणारा हा उत्सव म्हणजे हरेक रोहेकरांचा आपला उत्सव!

हा सोहळा म्हणजे हिरवाईने नटलेल्या निसर्ग देवतेला रोहेकरांनी लावलेली रुपेरी झालरच. बदलत्या काळानुरूप पोटापाण्यासाठी गावाबाहेर गेलेल्या रोहावासियांची नाळ या ग्रामदेवतेशी जोडलेली. म्हणूनच या पालखी उत्सवास रोहावासी आपल्या गावी येणारच.. भक्ताच्या भेटीसाठी येणाऱ्या आपल्या या ग्रामदेवतेचे आपल्या दारी स्वागत, पूजन करण्यासाठी त्याची पाऊले आपल्या गावाकडे वळतात..

आभाळाला स्पर्श करू पाहणारा कळसगिरी, हिरवाईने नटलेला डोंगराळ प्रदेश, रोह्यातील परिसर ताजातवाना ठेवण्यासाठी अव्याहत वहात असलेली कुंडलिका नदी अशा निसर्गरम्य रोहा शहराच्या पश्चिम वेशीवर सद्ध्याचे धावीर देवस्थान आहे.

धावीर महाराजांचे मूळ स्थान रोह्यातील वराठी डोंगरावर आहे. ते रोह्यात कसे आले याविषयी एक आख्यायिका आहे. आपला भाऊ धाकसुत याच्या मदतीने रोहा शाहरावर आलेली अनेक संकटे महाराजांनी दूर केली आणि आपला वरदहस्त ठेवत रोह्याचा विकास केला ही रोहावासिया:ची दृढ श्रद्धा आहे!

शासनाच्या तीर्थक्षेत्रविकास योजनेतून सद्ध्याचे प्रेक्षणीय देवस्थान उभे आहे. धावीर महाराजांचे वास्तव्य, आकर्षक मांडणी आणि भक्तांची भक्ती यामुळे हा परीसर प्रशांत व मांगल्याने भरलेला आहे. धावीरमहाराज आपले चांगलेच करणार या श्रद्धेने रोहेकर येथे नतमस्तक होतात.

धावीर महाराजांचे रूपदेखील नावाप्रमाणेच विशाल व भारदस्त. दहा वीरांचे तेज एकवटलेला त्याचा चेहरा. भारदस्त मिशा, लाल पगडी.. अन् तेवढेच वचक बसवणारे पण.. आशीर्वादयुक्त व प्रेमळ डोळे !

पोलिसांच्या मानवंदनेने सुरू होणारा हा पालखी सोहळा या कोकणातील एकमेव आहे. पालखी सोहळ्याच्या दिवशी पहाटेच रोहेकर लगबगीने देवस्थानाकडे जमतात. तथाकथित लोकनेते आणि हौशेनवशे यांचापण समावेश त्यात असतो. देवस्थानच्या ठिकाणी दिसणारा त्यांचा दिखाऊपणा हा रोहेकरांसाठी मनोरंजनात्मक खेळ असतो.

पोलीस सलामीची तयारी झाली की... घंटानाद सुरू होतो... नगारा वाजू लागतो... भक्तांच्या टाळ्या वाजू लागतात... सकाळी ६.१५ ला धावीरांची महाआरती होते... धावीर महाराज की जय हा जयघोष आसमंत दणाणून टाकतो... एकीकडे देवस्थानचे रीतीरिवाज पूर्ण होतात... आणि 'धावीर महाराजको सलामी देंगे' असा खणखणीत हुकूम होतो.. एकदम शांतता पसरते... पोलीसांची मानवंदना होते... जळत्या कापूराच्या पायघड्यांवरून धावीर महाराज पालखीत विराजमान होतात... आणि वाद्यांच्या गजरात पालखी शहराकडे मार्गस्थ होते.

धार्मिक सलोख्याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून या सोहळ्याकडे पाहता येईल. मोहल्ल्यातून मार्गक्रमण करत असताना मुसलमान समाजाकडून पालखीचा आदर सन्मान केला जातो. मुस्लिम बांधवही मोठया भक्तीभावाने स्वागत करतात.. हे या पालखी उत्सवाचे वैशिष्टय आहे.

ढोलताशांचे पथक, भजनी मंडळे, खालूबाजा पथके अबदागिरी, धूपपात्र... आणि त्यामागे... सजवलेल्या पालखीत विराजमान झालेले धावीर महाराज... त्यांचा जयघोष... अशा थाटात ही पालखी... गावातील प्रत्येक घरी जाते. गावभर रांगोळ्यांची सजावट असते. आपल्या आळीत पालखी आली की तेथील कार्यकर्ते पालखी खांद्यावर घेतात. प्रत्येक घरासमोर पालखी थांबते. धाविरमहाराजांना आरती ओवाळून हार नारळ प्रसाद अर्पण केला जातो आणि ' धावीर महाराज की जय ' अशा जयघोषात धावीर महाराज पुढेपुढे जात असतात... आपल्या भक्तांना आशीर्वाद देत... अभय देत..!

दुसऱ्या दिवशी सकाळी हा सोहळा देवस्थानात परतला की पुन्हा धावीर महाराजांना पोलीस सलामी देण्यात येते.. देवस्थानाकडून सर्व समाजातील मान्यवरांचा सन्मान केला जातो. धावीर महाराज गाभाऱ्यात स्थानापन्न झाले की आरती करून रोहेकर दर्शन घेऊन परततात .

रोहावासियांना पुढील वर्षभर शांती, समृद्धी आणि अभय देत धावीर महाराज गाभाऱ्यात विसावतात... आणि त्यांचा जागता पहारा गावाचे रक्षण करत आहे... या भावनेतून रोहावासी आपल्या दिनचर्येत मग्न होतात..

**- मिलिंद सिताराम अष्टीवकर - रोहा**

# राजिप नेणवली शाळेतील भोंडल्यात रंगले विद्यार्थी व पालक

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सर्वत्र शारदीय नवरात्रोत्सव उत्साहात साजरा होत असताना आश्विन महिन्यात घटस्थापना ही हस्त नक्षत्राच्या मुहूर्तावर होत असते. याचे औचित्य साधून नुकतेच सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा नेणवली येथे भोंडला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी आतोणे केंद्राच्या केंद्रप्रमुख कल्पना पाटील उपस्थित होत्या. त्यांनी सर्वप्रथम हत्तीची पूजा करून कार्यक्रमाचे उदघाटन केले. भोंडल्यासाठी गावातील महिला पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शाळेतील विद्यार्थिनी यांनी फेर धरून पारंपारिक गाणी म्हणून त्यावर ताल धरला. त्याचबरोबर गरबा सुद्धा खेळला. एलमा-पैलमा गणेश देवा, अक्कण माती-चिक्कण माती, एक लिंबू झेलू बाई ह्यासारखी हादगा व भोंडल्याची गीतावर गोलाकार फेर धरले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष हरपाल, उपशिक्षक, राजेंद्र अंबिके व गणपत वरगडे यांनी नियोजन केले.

भोंडल्याचा प्रसाद म्हणून खिरापत वाटण्यात आली. सर्व मुलांनी डब्यात खाऊ आणला होता. गोलाकार बसून प्रत्येक मुलांनी तो डबा वाजवून त्या ध्वनीतुन इतरांनी डब्यातील पदार्थ ओळखणे असा ओळखा पाहू? असा गमतीदार खेळ घेऊन त्या सर्व पदार्थांचा काला करून सर्वांना प्रसाद म्हणून वाटून त्याचा आस्वाद घेतला.



यावेळी केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांनी उपस्थित विद्यार्थी व महिलांना भोंडल्याचे महत्व सोप्या भाषेत सांगून मार्गदर्शन केले.

# खारघर परिसरातून कारटेपची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरातून उभ्या असलेल्या महागड्या गाडीतील कारटेप चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

खारघर वसाहत परिसरात हावरे स्प्लेंडर परिसरात रस्त्यावर एक मारुती कंपनीची गाडी उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडीची डाव्या बाजूची काच फोडून आतमध्ये असलेला महागडा कारटेप चोरुन नेला आहे. गेल्या काही दिवसापासून कारटेप चोरीचे प्रमाण वाढल्याने वाहन मालकांमध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

# तीन चोरट्यांना धाडसी महिलेने लावले पळवून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रात्रीच्या वेळी दुचाकीवर जाणाऱ्या महिलेला तीन चोरट्यांनी लुटण्यासाठी हल्ला केला. या हल्लृयाचा धडाडीने प्रतिकार करीत महिलेने चोरट्यांना पळवून लावले. मध्यरात्री या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांनी त्या जखमी रणरागिणीला मदतीचा हात दिला मात्र तिने प्रतिकाराचे धाडसच केले नसते तर सोन्याच्या मंगळसूत्रासह तिचे प्राण धोक्यात आले असते. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन दलाच्या केंद्रासमोरील मार्गावर ही घटना घडली आहे.

या धाडसी महिलेचे नाव प्रियंका बागलगुंड असे आहे. सध्या या महिलेच्या खांद्याला व गुडघ्याला मार लागला असून तिची प्रकृती बरी आहे. २६ वर्षीय प्रियंका हिच्या नातेवाईक महिलेला कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात त्याच रात्री साडेअकरा वाजता बाळ झाल्याने त्या रुग्णालयात माता व बालकाची खबर घेऊन घरी जात असताना ही घटना घडली. प्रियंका तळोजातील एका कारखान्यांत रासायनिक प्रयोगशाळा विभागात काम करतात. प्रियंका रुग्णालयातून निघाल्यानंतर त्यांनी पतीला फोन करून त्या दुचाकीवरून घरी येत असल्याची माहिती दिली.

दुचाकी चालविणाऱ्या प्रियंका हिचा पाठलाग एका दुचाकीवरून एक अनोळखी त्रिकुट करत होते. त्यांनी तळोजा औद्योगिक वसाहतीमधील अंधाराचा फायदा उचलत प्रियंका यांच्यावर धावत्या दुचाकीवर हल्ला केला. चोरट्याने प्रियंका यांचा मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न सुरुवातीला केला.

मात्र प्रियंका या दुचाकीचा वेग कमी करत नसल्याचे पाहून चोरट्याने त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्रावर हात मारला. तीन चोरटे व एकट्या प्रियंका यांची दुचाकींवर सुरू असलेल्या झटापटीचा हा सर्व थरार तळोजातील रस्त्यावर सुरू होता. प्रियंका यांनी एका हाताने दुचाकी चालवली तर दुसऱ्या हाताने चोरट्यांच्या हल्लृयाला धावत्या दुचाकीवरुन प्रतिकार केला. यामध्ये त्या दुचाकीवरून खाली कोसळल्या आणि त्यांनी चोरट्यांनाच आव्हान देत त्या किंचाळल्या.

प्रियंका यांची ही कल्काचाळी त्या रस्त्यावर जाणाऱ्या इतर प्रवाशांनी ऐकून तेथे धाव घेतली. प्रियंका यांचे हे दुर्गेचे रुप पाहून चोरटेही पसार झाले. एक तीन आसनी रिक्षाचालकांसह तेथे दीपक फर्टिलायझर कंपनीचे तोंडगे गावातील ठेकेदार महेश पाटील हे आले. रिक्षाचालकाने रस्त्यावर पडलेल्या प्रियंका यांना पदपथावर बसवले. त्यानंतर महेश पाटील यांनी दीपक फर्टिलायझर कंपनीच्या डॉक्टरांना तेथे आणून प्रियंका यांना डॉक्टरांनी प्रथमोपचार दिले.

# ज्येष्ठ नागरिकाला २७ लाख रुपयांचा ऑनलाइन गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला ऑनलाइन व्यवहारात भामट्यांनी २७ लाख रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अनोळखी चोरट्यांविरोधात तक्रार दिली असून पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. अजय उमापद मित्रा असे या सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. मित्रा हे कामोठे येथील सेक्टर २० मधील पार्थ न्हेन्यू या सोसायटीत राहतात.

मित्रा यांनी सोफा व बेड विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे एका नामांकित संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यावर भामट्यांनी मित्रा यांच्याशी संपर्क साधून या वस्तू खरेदीची तयारी असल्याचे भासविले. प्रत्यक्षात सहा भामट्यांनी मित्रा यांना वेळोवेळी व्यवहार पूर्ण होणार असल्याचे आश्वासन देऊन त्यांच्याकडून २७ लाख ७७ हजार २३५ रुपये ऑनलाइन पद्धतीने फसवणूक करून लंपास केले. अखेर मित्रा यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

# भीषण अपघात! घोणसे घाटात ट्रेलरचा चक्काचूर; महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील अपघाताचा कर्दनकाळ ठरत असलेल्या घोणसे घाटात बुधवारी (दि.५) ट्रेलरचा भीषण अपघात झाला. यामध्ये ५५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून चौघेजण गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. म.रा.र.विकास मंडळाकडून योग्य त्या उपाययोजना व रस्त्यांची दुरुस्ती होत नसल्यामुळे घोणसे घाटात सातत्याने अपघात होत आहेत. या महिन्यातील ही तीसरी घटना असून प्रशासनाला जाग केव्हा येणार, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.



मिळालेल्या माहितीनूसार, एमएच ४३ वाय ७६६४ या क्रमांकाचा सीमेंट ब्रिक्सने भरलेल्या ट्रेलरची तीव्र उतारावर संरक्षक भिंतीला धडक लागली. ३० ते ३५ टन क्षमतेच्या ट्रेलरच्या अपघातात केबिनचा चक्काचूर झाला. याबाबतची माहिती मिळताच मतदकार्य सुरु करण्यात आले. मृतांमध्ये चांदोरला बसलेली खरसईतील महिला देवका रामा भुनेसर (वय ५५) यांचा मृत्यू झाला असून चालक सद्दाम शहा (वय ३५, भिवंडी), किशोर पांडुरंग हेलोंडे (वय ३७, बेटकर वाडी), योगेश काप (वय २६, निगडी), अतिष तांबे (वय ३६, कांदळवाडा) या चौघांची प्रकृती गंभीर असून त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात तातडीने हलविण्यात आले आहे.

अपघाताचे वृत्त समजताच म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी अपघातस्थळी पोहोचून त्वरित मदतकार्य सुरु केले.

जखमींना तातडीने ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. यावेळी देवघर-घोणसे येथील स्थानिक सामाजिक कार्यकर्ते अनिल महामुनकर, अमोल कोतवाल, सचिन महामुनकर सुरेंद्र शिर्के, विलास कदम, योगेश महागावकर, अमोल गणवे, शरद कांबळे आदींनी सहकार्य केले.

# जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या सौजन्याने उलवे नोडमध्ये पहिल्यांदाच काँग्रेस तर्फे भव्य दांडियाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची सूत्रे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी हाती घेतल्यापासून रायगड जिल्ह्यात ते विविध सामाजिक उपक्रम राबवून काँग्रेस पक्षामध्ये नवचैतन्य आणण्याचे काम करत आहेत. काँग्रेस पक्षाचा तळागाळात प्रचार प्रसार करत विविध सामाजिक उपक्रमही मोठ्या प्रमाणात राबवत आहेत. गव्हाण येथे आरोग्य शिबीर, उलवे येथे ओबीसी मेळावा, कोकण विभाग काँग्रेस मेळावा, क्रिकेट स्पर्धा, दहीहंडी व आता उलवे नोड येथे अतिशय सुनियोजित भव्य गरबा व दांडिया कार्यक्रमाचे आयोजन महेंद्रशेठ घरत यांच्या सौजन्याने करण्यात आले होते.

यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था व रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सेक्टर - १८ प्लॉट नंबर - ११४, उलवे नोड येथे अतिशय नियोजन बद्ध व भव्य दांडियांचे आयोजन करण्यात आले होते. दररोज शेकडो दांडिया रसिकांनी वेगवेगळ्या वेशभूषा करून यामध्ये सहभाग घेतला. आयोजकांतर्फे रोज आकर्षक दहा ते पंधरा बक्षिसे देण्यात येत होती. शेवटच्या दिवशी तर बंपर बक्षिसे देण्यात आली. यामध्ये LED TV, ओव्हन, होम थिएटर, मिक्सर, व इतर अशी अनेक बक्षिसे देण्यात आली. या दांडिया कार्यक्रमासाठी सामाजिक, कला, राजकीय क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली व अतिशय सुरेख नियोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. पहिल्याच वर्षी आयोजकांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. उलवे वासियांसाठी दरवर्षी असेच चांगले सामाजिक उपक्रम राबविले जातील तसेच यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे लवकरच उलवे नोड वासियांना सुसज्य रुग्णवाहीका भेट देणार असल्याचे संस्थेतर्फे जाहीर करण्यात आले.



# महाड एस.टी. आगार सुविधांपासून वंचित

**दै.रायगड नगरी । महाड**

ऐतिहासिक महाड शहरातील एस.टी. बस स्थानकाची सध्या बिकट अवस्था असून आगारात सोईसुविधांचे तीनतेरा वाजले आहेत. बसेसची दुरवस्था, स्वच्छतागृहांमध्ये अस्वच्छता, रस्त्यावर पडलेले खड्डे, कचर्याचे साम्राज्य अशा समस्यांनी आगार ग्रासले आहे. येथील कर्मचारी विश्रामगृहात तर चालक वाहकांना नरकयातना सहन कराव्या लागत असल्याने या आगाराकडे कोणी लक्ष देईल का, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.



नियोजनाचा अभाव आणि वरिष्ठ कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे बस स्थानकावर असलेल्या निवारा शेड, कर्मचारी निवासस्थान, बस प्रमुख कार्यालय यांची पुरती वाट लागली आहे. किल्ले रायगड, चवदार तळे येथे भेट देण्यासाठी प्रतिवर्षी लाखो पर्यटक, भीमसैनिक, शिवप्रेमी महाडमध्ये येत असतात. येथील गैरसोय पाहून प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

कोरोना काळात सर्वच बस बंद होत्या. त्यानंतर २०२१ च्या पुरामध्ये महाड आगाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यात ६० बस पुराच्या पाण्यात खराब झाल्या होत्या. त्यामुळे ही वाहने बंद अवस्थेत होती. आज वर्ष उलटून गेले तरी या आगारात एकही नवीन बस आली नाही.

तसेच ग्रामीण भागात गेलेल्या बस देखील बंद पडत असल्याने ग्रामीण भागातून ये-जा करणार्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

# संक्षिप्त...

## क्लासला गेलेला मुलगा घरी परतलाच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून क्लासला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला मुलगा अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

यतीश शंकर पुजारी (२३ रा.मिनाक्षीनगर, उसर्ली खुर्द) रंग गव्हाळ, उंची ५ फुट, केस बारीक कापलेले, डोळे काळे, नाक सरळ, पायात सँण्डल असून अंगात मरुन कलरचा टी-शर्ट व ब्लॅक जीन्स पॅन्ट घातली आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पो.हवा.पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## सर्पमित्र संदीप घरतने दिले १५ फुटी महाकाय अजगरला जीवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सर्पमित्र संदीप घरत यांनी मुरुड शहरात १५ फुटी महाकाय अजगराला दिले जिवदान प्रथमच इतक्या मोठ्या महाकाय अजगराला पाहून सर्वच चकीत झाले होते. तब्बल दोन तासाच्या मेहनतीने या अजगरला जेरबंद करण्यात यश मिळवले. त्यानंतर वनखात्याच्या सहाय्याने जंगलात जाऊन सोडून देण्यात आले.

सदर घटना मुरुड एस.टि. आगारा नजीकच्या राजेश माने यांच्या घराच्या आवारात चिकूच्या झाडावर हा महाकाय अजगर बसला होता. त्याला पाहताच घरच्यांनी सर्पमित्र संदीप घरत यांना संपर्क करुन बोलावून घेतले. हि घटना रात्री ११ ध्या सुमारास घडली असल्याने या अजगरला पकडणे महा कठीण होते. त्यावेळी चिकूच्या झाडावर बसलेल्या अजगराला फांदी तोडून खाली पाडले व उपस्थित जनतेच्या सहाय्याने अजगरला जेरबंद केले व रात्री उशिरा जंगलात जाऊन सोडून दिले.




### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# रत्नेश्वरी मंदिर वाचविण्यासाठी पोस्टर आंदोलन

### मंदिर परिसरात विविध कामास ग्रामस्थांचा विरोध मात्र पोलीस संरक्षणात काम सुरू

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जसखार ग्रामपंचायतीच्या मासिक सभे मध्ये आई रत्नेश्वरी देवीच्या मंदिराच्या मागून चालू असलेल्या उड्डाण पुलाच्या कामामुळे मंदिराला आणि घरांना हादरे बसून मोठ्या प्रमाणात तडे जात आहेत. या करता ग्रामपंचायत कमिटी व ग्रामसुधारणा मंडळ जसखार आणि ग्रामस्थ जसखार यांनी या कामासंबंधी प्रलंबित प्रश्न सोडविण्याच्या मागणी करिता मंगळवारी दिनांक ०४.१०.२०२२ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता मंदिरा जवळ जाऊन काम बंद करण्याचा ठराव पास केला.व या करता गावातील नागरिकांना पोलिस संरक्षण मिळवण्याकरता एक पत्र न्हावा शेवा पोलीस निरीक्षक यांना दिला. त्यामधे जसखार ग्रामस्थांकडून काही मागण्या होत्या.त्या मागण्या खालीलप्रमाणे

मागील ४ वर्ष उड्डाण पुलाच्या अनियोजित कामामुळे गावात पूरपरीस्थिती निर्माण होऊन गावातील लोकांचे नुकसान झाले त्याची आर्थिक नुकसान भरपाई मिळावी. उड्डाण पुलाच्या कामामुळे हादरे बसून ज्या घरांना नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळावी. उड्डाण पुलामुळे आई रत्नेश्वरी देवीच्या मंदिराची नुकसानीची जबाबदारी जे. एन. पी. टी. प्रशासनाने लेखी घ्यावी. अशा प्रमुख ३ मागण्या आहेत.या मागण्या अजूनही प्रलंबितच आहेत. त्यामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

जे. एन. पी.टी. प्रशासनाने या उड्डाण पुलाचे काम चालू केले तेव्हा गावा मध्ये पब्लिक हेरिंग, चावडी वाचन, ग्राम पंचायत कडून नाहरकत दाखल अशा कुठल्याही परवानगी न घेता किंवा गावाचा विचार न करता हा काम चालू केला आहे. या करता ग्राम पंचायतीने गावाच्या संरक्षण करता मागणी केलेल्या पत्राच्या आधारे न्हावा



शेवा पोलीस निरीक्षक मधुकर भाटे यांनी उलट गावातील नागरिकांना कलम १४९ प्रमाणे नोटीस देऊन असे सूचित केले की मंगळवार दिनांक ०४.१०.२०२२ रोजी मंदिरा जवळ ५ किंवा ५ पेक्षा जास्त लोक जमली तर त्यांच्यावर कलम ३७ (१)(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल. आणि मंगळवार दिनांक ०४.१०.२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजल्या पासून मंदिर समोर उड्डाण पुलाच्या ठेकेदारा च्या संरक्षणा करता स्वतः न्हावा शेवा पोलीस निरीक्षक मधुकर भाटे यांच्यासह ५० पोलीस हवालदारांचा बंदोबस्त लावण्यात आला होता.ही बाब अन्यायकारक असल्याचे आंदोलन कर्ते तथा ग्रामस्थ ,देवीचे भक्तांनी सांगितले.

आमचा लढा कायदेशीर, लोकशाही मार्गाने सत्याच्या बाजूने असून देखील आम्हाला न्याय मिळत नाही. असी खंतही व्यक्त केली.या बाबतीत न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर भाटे यांच्याशी संपर्क केला असता तो होऊ शकला नाही. गावातील लोकांध्ये मंदिराविषयी जणजागृती करण्यासाठी नवरात्रीच्या शेवटच्या रात्री गावातील युवा सामाजिक संस्था तसेच ग्रामस्थांनी पोस्टर बाजी करून अनोख्या पध्दतीने आंदोलन केले.

## तळोजा कारागृहातील कैद्यांना काव्यानंदाचा समृध्द अनुभव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने तळोजा कारागृह मध्ये कैद्यांसाठी बंदिवान बांधवांसाठी 'कविता डॉट कॉम' कार्यक्रम अन्वय प्रतिष्ठानचे डॉ.अजित मगदूम यांच्या माध्यमातून कारागृह प्रशासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी आई, बाप, भाऊ ते विठोबा, तुकोबा आणि शिवबा यांच्या कविता सादर करण्यात आल्या. दुसऱ्या फेरीत काही प्रेम कविता, गझल, सामाजिक आशय पर कविता घेऊन कवी जितेंद्र लाड, वैभव वऱ्हाडी, शंकर गोपाळे, रुद्राक्ष पातारे, प्रा.रविंद्र पाटील आणि निवेदक नारायण पाटील यांनी आत्मचिंतन करायला प्रेरित केले. कविता डॉट कॉम परिवाराकडून भावनेला साद देत हात घालत माणुसकीची दाद देण्यात आली.

प्रत्येक जण चुकीला पात्र असतो. मात्र, चुकीची घोडचूक होऊ नये, जीवन सुंदर आहे. कारागृहातच गीता रहस्य, डिस्कवरी ऑफ इंडिया, श्यामची आई या ग्रंथांचा उगम आहे. म्हणजे जीवन संगम कालचे जीवन, आजचा दिवस आणि येणाऱ्या उद्या मधून त्रिवेणी संगम बनून जीवन गंगा पवित्र होऊ शकते याचा प्रत्यय सर्व बंदिवानांना कविता ऐवून आला.

औपचारिक बोलताना अधीक्षक पवार यांनी आपण नेहमीच सकस आणि वर्तन परिवर्तन करणाऱ्या उपक्रमास पाठींबा देत, तुरुंगातील बंदिंसाठी घराची आठवण कमी व्हावी म्हणून प्रयत्न करत असतो असे नमूद केले. अधीक्षक पवार, झुटाळे, शिंदे, महादेव पवार यांच्या सहयोगाने सदर कार्यक्रम सादर करण्यात आला.

# इमानदार पोलीस नाईक सुधाकर पाटील यांनी हरवलेल्या दागिन्यांची पिशवी केली ग्राहकास परत

### गहिवरलेल्या ग्राहकाच्या डोळ्यात आनंदाश्रू...

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : पोलीस म्हटले की दरारा पोलीस म्हटले की करड्या नजरेचा दबदबा परंतु त्यांचा हा दमदार पणा बेशिस्तीच्या व दंडेलशाहीच्या व दादागिरीवर वचक ठेवण्याकरीता असतो त्यांच्यातही एक माणुसकी चा व ईमानदारीचा झरा कुठेतरी अंतर्मनात असतोच.

याचे उत्तम उदाहरण नुकतेच कळंबोली वासीयांना पहावयास मिळाले याची हकीकत अशी की ईमानदार पोलीस नाईक सुधाकर पाटील हे खांदा कॉलनी येथील सप्तश्रृंगी सांस्कृतिक मंडळ येथे नवरात्री निमित्ताने रात्री बंदोबस्तास होते रात्रीचे जेवण करण्या करीता ते कळंबोली येथे १०-४५ वाजता येत असता कळंबोली येथील आत्माराम पाटील चौक येथे मोठ्या प्रमाणात नागरिकांची नवरात्री निमित्त वर्दळ होती. अचानक त्यांच्या गाडीपुढे एक पिशवी त्यांना दिसली. सदर पिशवी वरून अनेक गाड्या गेल्या होत्या. सदर पिशवी पोलीस नाईक सुधाकर पाटील यांनी उचलुन आपल्या ताब्यात घेऊन ते निवासस्थानी जेवण करण्याकरीता मार्गस्थ झाले घरी जाऊन पिशवी तशीच टेबलवर ठेवुन ते जेवण आटपुन पुन्हा खांदा कॉलनी येथे वरीष्ठांच्या आदेशानुसार पेट्रोलींग करीता आले. रात्री घरी पुन्हा येण्यास उशीर झाल्याने दमलेले सुधाकर पाटील यांचा डोळा कधी लागला याची त्यांना ही कल्पना आली नाही. त्यामुळे मिळालेल्या पिशवीत काय आहे व ती कोणाची आहे हे झोपेमुळे ते विसरून गेले सकाळी उठल्यावर त्यांच्या लक्षात आले की सदर पिशवीत काय आहे हे पहावे!

पिशवी उघडताच त्यांना आश्चर्य वाटले पहातो तो काय त्यात दोन सोन्याच्या लखलखत्या नव्या चेन होत्या व त्यावर कळंबोली येथील सोनार मॉ मनसा ज्वेलर्स व मोबाईल नंबर होता क्षणाचाही विलंब न लावता पाटील यांनी आपली इमानदारी दाखवुन देत सदर सोनाराची शहानिशा करून त्वरीत सोन्याची पेढी गाठली व तेथील मालक विश्वजीत मन्ना यांची भेट घेऊन खात्री केली असता ज्वेलर्स मालक यांनी सदर दोन्ही चेन २८, ग्रॅम ७५५ मिली अंदाजे रक्कम १ लाख ४५ हजार रूपयाच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन्ही चेन ह्या प्रदीप पिल्ले रा.कळंबोली निल संकुल बिल्डीग यांनी दसरा असल्याने आधीच एक दिवस मुलींकरीता खरेदी माझ्याकडुन केल्या असल्याचे सांगितले पो.नाईक सुधाकर पाटील यांची ईमानदारी पाहुन ज्वेलर्स मालकाने चक्क २ कीलो पेढे आणुन पाटील यांच्याकडे देऊन त्यांचा तेथेच सत्कार केला. याच दरम्यान आपल्या हातुन दागिन्याची पिशवी हरविल्याची तक्रार प्रदीप पिल्ले रा.कळंबोली यांनी कळबोली पोलीस ठाण्यात फीर्याद दिली होती त्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करणार होते. परंतु पो.नाईक सुधाकर पाटील यांच्यासारख्या ईमानदार पोलीसाने ह्या तपासास पुर्णविरामच दिल्याचे कळंबोली वासियांत बोलले जात आहे अशा ईमानदार पो. ना.सुधाकर पाटील यांचा कळबोली पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते सत्काराचे आयोजनही केले गेले.



कळंबोली वरीष्ठ पोलीस निरीक्षक व कर्मचारी यांच्या समक्ष प्रदीप पिल्ले कुटुंबियांचे लाखोचे दागिने सुपूर्द करताना ईमानदार पोलीस नाईक सुधाकर पाटील दिसत असताना

# ए रिक्षावाला म्हणू नका, ओ रिक्षावाले म्हणा...

### सहजसेवा फाउंडेशनची रिक्षा चालकांसाठी सहज जनजागृती

**दै.रायगड नगरी । खोपोली**

बुधवार दि. ०५ ऑक्टोबर .२०२२ रोजी सहजसेवा फाउंडेशन व अगरवाल प्रिंटर्स, शिळफाटा यांच्या वतीने एकता रिक्षा चालक मालक संघटना, कार्यालय, शिळफाटा- खोपोली येथे खालापूर तालुक्यातील ऑटो रिक्षा चालकांच्या सन्मानार्थ रिक्षामध्ये स्टीकरच्या माध्यमातून जनजागृतीचे आयोजन करण्यात आले.रिक्षा चालक हा सकाळपासून रात्री दहा वाजेपर्यंत प्रमाणिकपणे रिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करत असला तरी तो एका प्रकारे समाजसेवा करत असल्यास ने त्यालाही स्वाभिमानाने सन्मानाची वागणूक मिळायला पाहिजे.

आपण रिक्षाकडे फक्त एक प्रवासी वाहन म्हणून पाहतो. प्रवाशांचा सुखद प्रवास व्हावा यासाठी काही हौशी रिक्षाचालक आपल्या रिक्षा अगदी कल्पकतेने सजविण्याचे काम करीत असतात .यावेळी ए रिक्षावाला म्हणू नका, ओ रिक्षावाले म्हणा असे संदेश देतानाश्रमिकांना सन्मान द्या. या संदेशासोबत घरातून बाहेर पडताना ही महत्त्वपूर्ण काळजी अवश्य घ्या? वीज उपकरणे बंध केली आहेत ना? पाण्याचा नळ सुरु ठेवला नाहीत ना? गॅस सिलेंडरचा स्विच बंद केला आहे ना? दरवाजा वेवस्थित लॉक केला आहे ना? खाद्यपदार्थ वेवस्थित झाकळे आहे ना?या सह अनेक महत्वाची घ्यावयाची दक्षता नमूद करण्यात आली.

सेना चालक मालक संघटनेचे अध्यक्ष भाई शिंदे व एकता रिक्षा चालक मालक संघाचे अध्यक्ष एकनाथ पिंगळे यांच्या हस्ते दसऱ्याच्या मुहूर्तावर स्टिकरचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अगरवाल प्रिंटर्सचे संचालक तुषार अगरवाल, खोपोली पोलीस स्टेशनचे उप निरीक्षक जगदीश ठमके, सहजसेवा फाउंडेशनचे सल्लागार अशोक ठकेकर,हानीफ दुदूके, मार्गदर्शक मोहन केदार, तालुका प्रमुख तैफिक कर्जिकर, विरांगणा सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा खेडकर,



सामजिक कार्यकर्ते किर्ती ओसवाल, दिवेश राठोड, रिक्षा असोसिएशनचे किशोर सुतार, विकास साखरे, रामदास करकरे, सुनील खोपे, विक्रम कुलथे, रमेश तेलंगे, रमेश गायकर, बाबु साळुंखे, प्रदीप तळकर,जमील भाई, आरटीओ सल्लागार गणेश जांभळे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर. जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशीका शेलार, सचिव वर्षा मोरे,खजिनदार संतोष गायकर,संघटिका निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, उपक्रम प्रमुख तुषार अगरवाल, दिपाली जोशी, सागरिका जांभळे यांनी अथक परिश्रम घेतले. रिक्षा चालकांना दिलेला सन्मान हा नक्कीच समाजात चांगला संदेश देणारा आहे याचसोबत रिक्षा संदर्भात असणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न करताना जनतेने सहकार्य करावे अशी सदिच्छा एकता रिक्षा चालक मालक संघटनेचे अध्यक्ष एकनाथ पिंगळे यांनी व्यक्त केली.

## वृत्तबद्ध काव्य आणि गजल कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल संचालित 'साहित्यसाधना' या समूहाच्या वतीने वृत्तबद्ध काव्य व गज़ल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. साहित्यिक शंकर आपटे व कवयित्री स्वाती लेले यांच्या प्रयत्नाने नवीन पनवेल येथील डॉ. कीर्ती समुद्र यांच्या डायबेटिक क्लिनिक हॉलमधे ही कार्यशाळा संपन्न झाली.

कवी, गज़लकार विजय जोशी (विजो) यानी कार्यशाळेत सहभागी नवोदित कवीना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, चांगल्या कवीला कवितेच्या सर्व प्रकारांमध्ये लिहिता आलं पाहिजे आणि त्याने विविध विषय हाताळले पाहिजेत. डोळसपणे अभ्यास करताना तसे प्रामाणिक प्रयत्न कवीने केला पाहिजे. सध्या सर्वत्र मुक्तच्छंदाचे पीक आलेले असताना तरूण पिढी पुन्हा वृत्तबद्ध कवितेकडे वळते आहे हे स्तुत्य आणि काव्यसाहित्याला सुगीचे दिवस देणारे समाधानकारक चित्र आहे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. शालेय अभ्यासक्रमामध्ये नवोदितांना मार्गदर्शक असा वृत्तबद्ध कवितेसाठीचा अभ्यास असला पाहिजे असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. डॉ. कीर्ती व गिरीश समुद्र व नेहा सोमण यानी या कार्यशाळेसाठी मोलाचे योगदान दिले. पनवेल व अलिबाग परिसरातील नवोदित कवीनी याचा लाभ घेतला.

## जासई हायस्कूलला उपक्रमशील शाळा पुरस्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध नामवंत संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या चार ऑक्टोबर वर्धापन दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेमार्फत दिला जाणारा दि.बा. पाटील साहेब यांच्या नावाने दिला जाणारा उपक्रमशील शाळा हा पुरस्कार उरण तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील जुनिअर कॉलेज जासई या विद्यालयास प्राप्त झाला आहे.

हा पुरस्कार ४ ऑक्टोबर रोजी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉक्टर अनिल पाटील व महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण घाग यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद घेतला. तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या. व लोकनेते दि.बा. पाटील यांच्या घरी त्यांच्या नावे मिळालेल्या पुरस्काराची माहिती त्यांचे पुत्र अतुल पाटील व कुटुंबीयांना दिली. यावेळी भारतीय मजदूर



संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस व कामगार नेते सुरेश पाटील, विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ व अरुण घाग, रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख, लेखनिक सुरेश ठाकूर यांनी आशीर्वाद घेतला व दसऱ्यानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## खेरणे ग्रामपंचायतसाठी १६ ऑक्टोबर रोजी मतदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील खेरणे ग्रामपंचायतसाठी १६ ऑक्टोबर रोजी मतदान होत आहे. तर १७ ऑक्टोबर रोजी पनवेल तहसील कार्यालय येथे मतमोजणी होणार आहे.

थेट सरपंचपदाच्या या निवडणुकीत सरपंच पदासाठी चार अर्ज करण्यात आले आहेत. तर सदस्यांसाठी २२ अर्ज करण्यात आलेले आहेत.

महाविकास आघाडी व भाजपमध्ये ही लढत होणार आहे. पनवेल तालुक्यात केवळ एकाच ग्रामपंचायतीसाठी १६ ऑक्टोबर रोजी मतदान होत आहे. त्यामुळे यात महाविकास आघाडी बाजी मारणार की भाजप बाजी मारणार हे १७ ऑक्टोबर रोजी स्पष्ट होणार आहे.

## जिल्हास्तर क्लासिक बेंच-प्रेस स्पर्धेत चमकदार कामगिरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जिल्हास्तर क्लासिक बेंच-प्रेस स्पर्धेत मास्टर गटात सांघीक विजेते पदासह नितीन शेजवळ ठरला स्ट्राँग मॅनचा मानकरी ठरला आहे.

ठाणे जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशन,ठाणे व रिओ फिटनेस, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तर सिनियर/मास्टर (पुरुष/महिला) क्लासिक बेंच-प्रेस स्पर्धचे आयोजन लोकमान्य नगर, ठाणे या ठिकाणी करण्यात आले होते या स्पर्धेत संजय हेडगे स्पोर्ट्स अकॅडमी, कर्जत, रायगड मधील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केलं. मास्टर गट (क्लासिक) ५९ कि. नितीन शेजवळ-सुवर्णपदक, ७४ कि. नवनाथ दाभाडे - सुवर्णपदक, ७४ कि. नितेश राणे -रजत पदक, ८३ कि. सचिन देशमुख -रजत पदक, १०५ कि. नासिर सय्यद -सुवर्णपदक.

सिनिअर (मुले) ६६कि. कु.शिवतेज ठाकरे-सुवर्णपदक,७४ कि. कु. राज यादव-रजतपदक, ८३ कि. कु. ओमकार भोपतराव -रजत पदक, सिनियर (मुली )४७ कि. कु. नंदिनी उप्पर-सुवर्ण पदक, ५७ कि. कु. सुजाता परदेशीं -कास्य पदक, ५७ कि. श्वेता जैन - चतुर्थ क्रमांक, ६३ कि. कु. नेहा



पाटील-कास्य पदक, मास्टर गट - सांघिक विजेते पद, स्ट्राँग- मॅन - (मास्टर गट) नितीन शेजवल, वरील सुवर्ण पदक विजेते खेळाडूची आगामी होणाऱ्या राज्यस्तर (STATE LEVEL) क्लासिक बेंच-प्रेस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रशिक्षक म्हणून सिद्धार्थ शिंदे यांनी धुरा सांभाळली व मार्गदर्शक म्हणून एन. डी. दाभाडे ( राष्ट्रीय खेळाडू/पंच) यांनी काम पहिले.